सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज.१७४..ठ. क्र. १७३
दि. १७/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत विशेष उद्देश वाहन (स्पेशल व्हेईकल) सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.च्या संचालक मंडळाबाबत मा.म.न.पा.ठराव क्र. ३३९, दि. ८-३-२०१६ व मा.म.न.पा. ठराव क्र. २३, दि. १२-५-१६ च्या अनुषंगाने प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. शासनाचे अवर सचिव यांनी जा.क्र. स्मार्टसि.सोलापूर-२०१६/प्र.क्र.३४६/नवि-२३, दिनांक ९ ऑगस्ट २०१६ अन्वये कळविले आहे की, दि. १४-३-२०१६, दि. ११-४-२०१६ व दि. १०-५-२०१६ अन्वये सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरिता विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) चे गठण करण्याविषयी सविस्तर निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाचे गठण करणे आवश्यक आहे. उक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबींचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी असे प्रस्तावात सोबतच्या पत्राद्वारे कळविण्यांत आले आहे. यासंदर्भात शासन निर्णयानुसार सोलापूर महानगरपालिकेचे ६ संचालक असतील या सहा संचालकामध्ये १) महापौर २) अध्यक्ष, स्थायी समिती ३) सभागृह नेता ४) विरोधी पक्षनेता, सोलापूर महानगरपालिका असे १ ते ४ पदनिर्देशित संचालक असतील. त्याचप्रमाणे, व्यापक राजकी प्रतिनिधीत्व देण्याच्या उद्देशाने विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) वर प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक आहे. याकरिता वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशित संचालक म्हणून नियुक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/राज्य मान्यताप्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशित करण्यात येतील, याप्रमाणे तरतूद नमूद करण्यांत आली आहे. आजला शासन निर्णयातील तरतुदीनुसार १) मा. महापौर,२) अध्यक्ष, स्थायी समिती, ३) मा. सभागृह नेता ४) मा. विरोधी पक्षनेता हे चार संचालक सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. या कंपनीमध्ये संचालक पदी नियुक्त आहेत. तरी उक्तप्रमाणे शासनाने कळविल्यानुसार शासन निर्णयातील नमूद तरतुदीनुसार उर्वरीत दोन संचालक नामनिर्देशनासंदर्भात सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय होणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १६-८-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

स्मार्ट सिटी योजनेसंदर्भात विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) स्थापनेबाबत महानगरपालिकेने ठराव क्र. २३, दि. १२-५-१६ रोजी सविस्तर असा कायदेशीर ठराव पारित केलेला आहे. या ठरावामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये मा. सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३३९, दि. ८-३-२०१६ रोजी केलेला ठराव योग्य व कायदेशीर असल्याचे नमूद करुन तो ठराव कायम केलेला आहे.

ठराव क्रमांक २३, दि. १२-५-२०१६ हा ठराव देखील मा. शासनाने विखंडीत केल्याचे कोणतेही पत्र महानगरपालिकेला दिलेले नाही. अथवा केलेला ठराव महानगरपालिकेच्या अधिनियमाचे तरतुदीनुसार बेकायदेशीर आहे असे कोठेही म्हटले नाही. त्यामुळे महानगरपालिकेने वर नमूद केल्याप्रमाणे पारित केलेले दोन्ही ठराव हे योग्य व कायदेशीर असल्याने सदरचे ठराव कायम करण्यांत येत असून, त्याची अंमलबजावणी मा. आयुक्तांनी करावी यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~आमुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 936 ठ. क्र. 908
दि. 26/10/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



आरोग्य विभागाकडील वैद्यकीय अधिका-यांचे मुदतवाढी बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावातील तक्त्यातील नमूद सध्या एकवट मानधनावर कार्यरत असलेले अनुक्रमांक १ ते ५ यांना देण्यांत आलेली मुदत दि. ०४-०५-१६ रोजी संपुष्टात आलेली असल्याने, त्यांना दि. ०५-०५-२०१६ व दि. ०६-०५-२०१६ रोजी दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. ०७-०५-२०१६ पासून ११ महिन्याच्या कालावधी करिता एकवट मानधन रुपये २५,०००/- यावर मुदतवाढ देणेकामी सदर प्रस्तावास मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता मिळणेस्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. २६१, दिनांक २२-७-२०१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सेवेचे वेळापत्रक निश्चित करुन त्याप्रमाणे कार्यवाही ठेवण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका